निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५६ वा.
गुरुवार :२० नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

शिंदेंची नाराजी आणि अमित शाह यांच्याशी झालेला 'खुलासा संवाद'

नवी दिल्ली/ राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत घेतलेल्या या भेटीला राज्यातील राजकीय घडामोडींमध्ये विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. दोघांमध्ये जवळपास ४५ मिनिटे सखोल चर्चा झाली. ही बैठक फक्त औपचारिक नव्हती, तर सध्याच्या महायुतीच्या अंतर्गत राजकारणातील ताणतणाव, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेले मतभेद, तसेच काही वरिष्ठ नेत्यांच्या कार्यशैलीबद्दल शिंदे यांनी व्यक्त केलेल्या नाराजीमुळे अधिकच गाजत आहे.

एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्यासमोर निर्विवादपणे आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की-

* काही नेते वैयक्तिक स्वार्थापोटी काम करत आहेत , ज्यामुळे महायुतीची प्रतिमा मलिन होते.
* या कारणामुळे मीडियामध्ये उलटसुलट बातम्या पसरत आहेत, ज्याचा परिणाम थेट जनमानसावर होत आहे.
* कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि युतीच्या एकजुटीला तडा जातो.

यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनावश्यक अडथळे निर्माण होऊ शकतात , असा इशाराही त्यांनी दिला.

या चर्चेदरम्यान शिंदे यांनी थेट हस्तक्षेप नको, समन्वय हवा, आणि सामायिक नेतृत्व प्रभावी राहील यावर विशेष जोर दिला.

युतीतील मतभेद टाळण्यावर भर

शिंदे यांनी अमित शाह यांना सांगितलं की महायुतीने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये मिळवलेला विजय अतिशय निर्णायक होता. आता त्याच ऊर्जेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये लढायचे असताना-

* कोणत्याही पक्षातील नेत्यांनी एकमेकांवर टीका करू नये ,
* भाष्य करताना संयम व जबाबदारी बाळगावी,
* आणि महायुतीविरुद्ध विरोधकांना आयते कोलीत मिळेल अशी कोणतीही परिस्थिती निर्माण होऊ नये.

असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

'अंतर्गत प्रवेश' टाळण्यावर दोन्ही नेत्यांत एकमत

मंगळवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना शिंदे यांनी सांगितले की-

भाजपा-शिवसेना किंवा शिवसेना-भाजपा यांच्यातील अंतर्गत प्रवेश (cross-over) पूर्णपणे थांबवण्यावर त्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या चर्चेत ठोस एकमत झाले आहे.

मुख्यमंत्रीही लवकरच आपापल्या

पक्षातील कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देणार आहेत-

* महायुतीत कोणताही गालबोट लागणार नाही,
* मिठाचा खडा पडणार नाही,
* आणि अनावश्यक मतभेद निर्माण होणार नाहीत,

याची दक्षता सर्वांनी घ्यावी.

पुढील राजकीय दिशा - एकनाथ शिंदे यांची भूमिका

शिंदे यांनी सांगितले की महायुतीला लोकांनी मोठा कौल दिला असून त्या विश्वासाला तडा जाऊ नये हे प्रमुख ध्येय आहे. ते म्हणाले-

महायुती म्हणून आपण एकत्र लढलो, ऐतिहासिक विजय मिळवला. आता स्थानिक निवडणुकीचे वातावरण बिघडू नये ही आमची भूमिका आहे.

ते पुढे म्हणाले-

* पक्षाच्या आचारसंहितेचं काटेकोर पालन केलं पाहिजे,
* अंतर्गत संघर्ष, अफवा किंवा भ्रम निर्माण करणारी वागणूक सहन केली जाणार नाही,
* आणि प्रत्येकाने जनतेसमोर एकजुटीचा संदेश जायला हवा.

एकूण चित्र

या भेटीमुळे महायुतीतील सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना नवीन दिशा मिळाली आहे.

एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांच्याशी खुल्या दिलाने नाराजी व्यक्त केल्यानंतर, युतीत समन्वय वाढवण्यासाठी काही ठोस पावले उचलली जातील, असे भासते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कालखंड जवळ येत असल्याने या बैठकीची चर्चा आणखी रंगणार आहे.

अकोला व यवतमाळ येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालये तातडीने सुरु करा - विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

मुंबई/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत अकोला व यवतमाळ येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालये खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर तातडीने सुरू करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

विधानभवनात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत लातूर, अकोला, छत्रपती संभाजीनगर आणि यवतमाळ येथील चार सुपर स्पेशालिटी रुग्णालये खासगी भागीदारी धोरणानुसार सुरू करण्याबाबत आढावा बैठक झाली.

बैठकीस वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभागाचे आयुक्त अनिल भंडारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले, अकोला व यवतमाळ येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालये तात्काळ सुरू करण्यात यावीत. छत्रपती संभाजीनगर व लातूरसुपर स्पेशालिटी रुग्णालयासंदर्भातील कार्यवाहीही तातडीने करण्याचे निर्देश उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांनी दिले.

मुंबईतील स्वच्छता विषयक 'सुविधा केंद्र' उपक्रम पथदर्शी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- मुंबई महानगर प्रदेशात स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला गती
- मुंबईत २४ केंद्रे, ९ केंद्रे प्रगतीपथावर
- ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण ५.५ लाख नागरिकांनी घेतला सुविधा केंद्राचा लाभ

मुंबई/ शहरी क्षेत्रातील स्वच्छता, पाणी-बचत आणि आरोग्य सुधारणा यासाठी सामाजिक उत्तरदायित्व मधून मुंबईत राबवण्यात आलेला'सुविधा केंद्र' उपक्रम आदर्श मॉडेल ठरत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान गती घेत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या अभियानात विविध संस्था जोडल्या जात आहेत.

हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त भागीदारीत सुरू झालेल्या या उपक्रमाने अल्पावधीत मोठे परिणाम साधले आहेत. सध्या मुंबईत २३ केंद्रे कार्यरत असून, लवकरच २४ वे केंद्र सुरू होणार आहे.

मुंबईत आणखी २ केंद्रे बांधकामाधीन असून ७ केंद्रांचे प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका, हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, एचएसबीसी आणि जेएसडब्ल्यू फाउंडेशन यांच्या सहकार्याने ही योजना पुढील काही वर्षांत अधिक विस्तारणार आहे.

शहरातील झोपडपट्टी आणि वंचित वस्त्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणाऱ्या स्वच्छता सुविधा देण्याचे उद्दिष्ट या केंद्रांमागे आहे. ५.५ लाख नागरिकांना आतापर्यंत याचा प्रत्यक्ष लाभ झाला असून, आरोग्यदृष्ट्यादेखील हे मॉडेल उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सुविधा केंद्रे ही स्वच्छतेच्या शाश्वत व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आणखी सुविधा केंद्रे सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

या प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबईसारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या महानगरात 'सुविधा केंद्र' मॉडेलने सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उत्तम कामाचे उदाहरण निर्माण केले आहे. ही केंद्रे शहराच्या आरोग्यसुरक्षेत मोठे योगदान देत आहेत. या सुविधा केंद्रामध्ये उत्तम सुविधा, लोकांचा सहभाग, वर्तणूक बदल, आर्थिक आणि पर्यावरण टिकाव आणि कार्यक्षम संचालन यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. हे सर्व अत्यंत उल्लेखनीय असून हा उपक्रम शहरी महाराष्ट्रासाठी आदर्शवत आहे.

उपक्रमाची वैशिष्ट्ये :

सुरक्षित आणि सन्मानजनक स्वच्छता

झोपडपट्टी व अनौपचारिक वसाहतींतील महिलांसाठी सुरक्षित शौचालय, मुलांसाठी स्वच्छ जागा, दिव्यांगांसाठी सुलभ रचना - या सर्व बाबींमुळे सुविधा केंद्रे अत्यंत लोकाभिमुख झाली आहेत.

पर्यावरणपूरक मॉडेल

जल-बचत तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि कचरा व्यवस्थापन यामुळे पर्यावरणीय शाश्वततेचा उत्तम नमुना तयार झाला आहे.

समुदायातील महिलांचा सहभाग

प्रशिक्षित ३०० महिलांनी राबवलेल्या वर्तनबदल मोहिमेमुळे ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण मिळाले. यामुळे नागरिकांच्या सवयी, वापर आणि आरोग्य-जाणीवेत सकारात्मक बदल घडला.

आरोग्यदायी परिणाम

'सुविधा केंद्रां'मुळे जठरांत्र, अतिसार आणि मूत्रमार्गाच्या संक्रमणात ५० टक्के घट झाली आहे. झोपडपट्टी क्षेत्रातील सर्वाधिक समस्या असलेल्या दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे होणारे आजार आता लक्षणीयरित्या कमी झाले आहेत.

आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण मॉडेल

सुरुवातीपासून ९ महिन्यांत केंद्र स्वतःचा खर्च भागवू लागते ही या योजनेची मोठी ताकद आहे. आज मुंबईतील सर्व २३ केंद्रे पूर्णपणे स्वयं-टिकाऊ आहेत.

पाणी भरण्याच्या वादात महिलेने तोंडावर मारला झुरळांचा स्प्रे; पोलिसांनी ठोकल्या बेड्या, कारण....

- झुरळं मारण्याच्या स्प्रेमुळे ५७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू
- पाणी भरण्यावरुन शेजारील महिलेसोबत झाला होता वाद
- भांडणात महिलेने स्प्रे तोंडावर मारल्यामुळे उमेश पवार यांचा मृत्यू

मुंबई/ विरारमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. झुरळं मारण्याच्या स्प्रे तोंडावर मारल्याने एका ५७ वर्षीय व्यक्तीला जीव गमवावा लागला आहे. विरार पश्चिम जेपी नगर येथील १५ नंबर इमारतीमध्ये हा प्रकार घडला आहे. पाणी भरण्यावरून झालेल्या वादानंतर महिलेने तोंडावर झुरळं मारण्याचा स्प्रे मारला होता. यामुळे उमेश पवार यांचा मृत्यू झाला आहे. अर्नाळा पोलिसांनी आरोपी महिला कुंदा उतेकरला अटक केली आहे. तिच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकं काय घडलं?

विरारमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. झुरळं मारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्प्रेमुळे एका ५७ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना विरार पश्चिम येथील जे.पी. नगरमधील १५ नंबर इमारतीत घडली आहे.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उमेश पवार असं मृत इसमाचं नाव असून त्यांचा शेजारी राहणाऱ्या महिलेसोबत पाणी भरण्याच्या कारणावरून वाद झाला होता. हा वाद प्रचंड चिघळला आणि संतापाच्या भरात संबंधित महिलेने घरात असलेलं झुरळं मारण्याचा स्प्रे उमेश पवार यांच्या तोंडावर मारला. या स्प्रेचा तीव्र परिणाम झाल्याने पवार यांची प्रकृती काही क्षणातच बिघडली. त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

हमीभाव खरेदी प्रक्रियेत बारदाना कमी पडणार नाही याची दक्षता घ्यावी - पणन मंत्री जयकुमार रावल

मुंबई/ राज्यात किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२५-२६ करिता सोयाबीन, उडीद आणि मूगाच्या हमीभावाने खरेदीसाठी ३० ऑक्टोबर पासून शेतकऱ्यांची

नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. मंगळवार १८ नोव्हेंबरपर्यंत दोन लाख २० हजार ३१६ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत होणाऱ्या खरेदीदरम्यान बारदान्याची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी यंत्रणांना दिले.

पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित बैठकीत किमान आधारभूत खरेदी किंमत योजनेअंतर्गत खरेदी प्रक्रिया आणि बारदाना उपलब्धतेसंदर्भात आढावा घेण्यात आला. प्रधान सचिव प्रवीण दराडे, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे पाटील, सहसचिव विजय लहाने, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम हे प्रत्यक्ष तर पणन संचालक, नाफेड आणि एनसीसीएफचे राज्यप्रमुख ऑनलाईन उपस्थित होते.

खरेदी केंद्रांसाठी शासनास ७२५ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापैकी ७१३ केंद्रांना शासनाने मान्यता दिली असून ५७९ केंद्र नाफेड/ एनसीसीएफने मंजूर केले आहेत. यापैकी ४८४ केंद्र कार्यान्वित झाले आहेत. मागील हंगामातील ५६२ केंद्रांच्या तुलनेत या हंगामात खरेदी केंद्रांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून या केंद्रांवर १८ नोव्हेंबरपर्यंत ५२८ लाभार्थी शेतकऱ्यांकडून ११ हजार ९९ क्विंटल खरेदी झाली आहे. यावर्षी सोयाबीनसाठी १८ लाख ५० हजार ७०० मे.टन, मूग साठी ३३ हजार मे.टन तर उडीद साठी तीन लाख २५ हजार ६८० मे.टन खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

केंद्र शासनाने या हंगामासाठी सोयाबीनचे आधारभूत दर ५३२८ रुपये प्रति क्विंटल निश्चित केले आहेत. यात मागील हंगामापेक्षा ४३६ रुपयांनी वाढ झाली आहे. मूगाचे दर ८७६८ रुपये प्रति क्विंटल असून या दरात ८६ रुपयांची वाढ झाली आहे. तर, उडीद चे आधारभूत दर ७८०० रुपये प्रति क्विंटल निश्चित करण्यात आले असून यामध्ये मागील हंगामाच्या तुलनेत ४०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

खरेदी प्रक्रिया राबविण्याकरीता केंद्र शासनाच्या नाफेड व एनसीसीएफ यांच्यावतीने राज्याच्या महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मुंबई, विदर्भ सहकारी पणन महासंघ नागपूर आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे या तीन नोडल संस्था निश्चित करण्यात आल्या आहेत. या संस्थांमार्फत १५ नोव्हेंबर २०२५ ते १२ फेब्रुवारी २०२६ या ९० दिवसांच्या कालावधीत खरेदी प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खरेदी प्रक्रियेदरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने दक्षता पथक स्थापन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

पणन मंत्री जयकुमार रावल यांनी संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेऊन खरेदी केंद्रांची संख्या आवश्यकतेनुसार वाढविण्याचे त्याचप्रमाणे खरेदी केलेला शेतमाल ठेवण्यासाठी गोडाऊन्सची संख्या वाढविण्याचे निर्देश दिले. त्याचप्रमाणे यासाठी लागणाऱ्या बारदानाचा पुरवठा वेळेवर होण्यासाठी तात्काळ मागणी नोंदविण्याचे निर्देश दिले.

फ्लाईंग शीख मिल्खा सिंग.....

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धाव-पटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लह-ानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली.

यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धे त त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धे त मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवण-ारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धे तही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली.

जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धे दरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली.

ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्न-ीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत.

मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उप-ाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धे त ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती.

मिल्खा सिंग हे भारता-तीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली.

मिल्खा सिंग यांना जयंतीदिनी विनम्र आदरांजली!

चीनशी झालेल्या करारामुळे अमेरिकेचा जीव भांड्यात!

अमेरिकेचे संबंध नेहमीच स्पर्धा, अविश्वास आणि आर्थिक टकरावांनी भरलेले राहिले आहेत. अशा परिस्थितीत चीनने इतर देशांसोबत केलेला कोणताही महत्त्वाचा करार अमेरिकेच्या भूराजकीय हितसंबंधांना थेट भिडणारा ठरतो. अलीकडेच चीनने ज्या करारावर शिक्कामोर्तब केले आहे, त्याचे परिणाम अमेरिकेसाठी चिंताजनक मानले जात आहेत.

कराराचा अमेरिकेवर परिणाम-अमेरिकेची धास्ती का वाढली?

१. लष्करी समतोलावर परिणाम

करार लष्करी सहकार्याशी संबंधित असल्यास, चीनला नवीन रणनीतिक ठिकाणे, बंदरे किंवा संरक्षण तंत्रज्ञानाचा प्रवेश मिळू शकतो. यामुळे आशिया-प्रशांत क्षेत्रातील अमेरिकेचे पारंपरिक वर्चस्व कमी होऊ शकते. अमेरिकेला भीती आहे की चीन आपली लष्करी उप-स्थिती पूर्वीपेक्षा अधिकप्रमाणात वाढवेल.

२. आर्थिक घेराबंदीचा धोका

चीन जागतिक व्यापार आणि गुंतवणुकीत आक्रमक धोरण वापरत आहे. जर हा करार आर्थिक भागीदारी, पायाभूत सुविधा गुंतवणूक किंवा नैसर्गिक संसाधनांवरील अधिकारांशी संबंधित असेल, तर चीन त्या प्रदेशात आपला आर्थिक प्रभाव प्रचंड वाढवू शकतो. यामुळे अमेरिकेचे पारंपरिक आर्थिक भागीदार चीनकडे झुकण्याची शक्यता वाढते.

३. तंत्रज्ञान क्षेत्रातील स्पर्धा तीव्र

चीन उच्च-तंत्रज्ञानात, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, 5G पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहे. करारामधून चीनला या क्षेत्रातील भागीदार देशांकडून मोठा बाजार किंवा सहकार्य मिळाल्यास अमेरिकेसाठी जागतिक तंत्रज्ञान नेतृत्व धोक्यात येऊ शकते.

४. राजनैतिक समीकरणात बदल

अमेरिकेचे अनेक देशांशी असलेले दीर्घकालीन राजनैतिक संबंध या करारानंतर कमकुवत होऊ शकतात. चीनची सॉफ्ट पॉवर आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमधील वाढती पकड पाहता, अमेरिकेला आपले धोरण पुनर्रचित करण्याची वेळ आली आहे.

अमेरिकेची प्रतिक्रिया कशी असेल?

* अमेरिकेने संबंधित देशांना पर्यायी आर्थिक व लष्करी सहकार्याची ऑफर देणे अपेक्षित आहे.
* इंडो-पॅसिफिक रणनीती अधिक आक्रमक होण्याची शक्यता.
* चीनविरोधी आंतरराष्ट्रीय मोर्चा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न.
* आर्थिक निर्बंध किंवा व्यापार धोरणात बदल करून चीनवर दबाव वाढवण्याची शक्यता.

चीनचा उद्देश काय?

चीनचा हेतू साधा आहे-

* आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत आपला प्रभाव प्रस्थापित करणे,
* अमेरिकेचे जागतिक नेतृत्व आव्हानासमोर उभे करणे,
* आणि आर्थिक-लष्करी घेराबंदीला उत्तर देणे.

पालकांनी बालकांशी पालकासम वागणे...

बालकदिनाचा खरा उद्देश म्हणजे बालक आपल्या समाजाचे भविष्य आहे याचे स्मरण समाजाला होणे आणि हे भविष्य सुरक्षित अस-ावे म्हणून बालकांप्रती समाजाच्या जबाबदारीची जाणीव वाढीस ला-गणे. प्रत्यक्षात एक सामाजिक घटक म्हणून किंवा पालक म्हणून आपली वागणूक बालकदिनाच्या उद्देशा-ला पूरक आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. १४ नोव्हेंबरच्या बालदिनाच्या पार्श्वभूमीवर ही संधी घेता येते.

शीर्षक वाचून मनात गोंधळ उडाला असणार. हरकत नाही. बालक आणि पालक यांचे एकमेकांशी कसे संबंध असावेत, हा विषय कायमच ज्वलंत राहणार आहे. प्रामुख्याने हे संबंध तपासताना आमचे पालक, आमचे लहानपण, आमचे पालकपण... या फुटपट्ट्या लावल्या जातात आणि नेमका तिथेच गोंधळ होतो. असो. निमित्त आहे बालक दिनाचे आणि नुकताच 'केबीसी'मध्ये इशित भट्ट हॉट सीटवर विराजमान झाल्यानंतरचा प्रसंग. या प्रसंगाच्या खोलात शिरण्याची गरज नाही, कारण तो सगळ्यांना माहीत आहे. या प्रसंगावर पालक, शिक्षक, समुपदेशक, बालमानसशास्त्रज्ञ, लाईफ कोच सगळ्यांनाच व्यक्त व्हावंसं वाटलं. त्यांनी लिखाणातून आपली मतं मांडली. सामान्य जनतेने गप्पांमधून, बडबड करून यथेच्छ तोंडसुख घेतलं. कुणी समाजमाध्यमाला, कुणी पालकत्वाला, कुणी शिक्षणपद्धतीला, कुणी संस्कारशून्य पिढीला तर कुणी विभक्त कुटुंबपद्धतीला जबाबदार ठरवलं. खरं तर, दुसऱ्याकडे बोट दाखवलं की उरलेल्या तीन बोटांची दिशा स्वतःकडे असते, हा साधा नियम आपण विसरून गेलोय. समोरच्याला दोषी ठरवण्यासाठी आम्ही इतके उता-वीळ, उत्तेजित आणि सर्वज्ञानी अस-तो की त्या भरात तारतम्य न ठेवता भाष्य करण्याचीच आम्हाला प्रौढी वाटते. किंबहुना, त्यासाठी हल्ली काही ना काही निमित्तच हवं असतं आणि तसं नसेल तर ते निमित्त शोधून काढलं जातं. त्यावर चर्चेचा धुरळा उडतो. मतमतांतरांचं मंथन होतं आणि काहीही निष्पन्न न होताच सगळं काही शांत होतं, विस्मरणात जातं.

इशीत भट्ट हा लहान मुलगा. जेमतेम दहा - बारा वर्षांचा मुलगा. या वयाची मुलं आपल्या घरात असली की हल्लीची पिढी काय हुषार आहे नाही, हे वाक्य आपण दिवसातून कमीत कमी तीनदा तरी आळवतो. पण हीच मुलं शेजारच्या घरात असली की आगाऊ आणि भोचक वाटू लागतात. इशीत भट्ट हा मुलगा नेमका 'केबीसी'मध्ये महानायक अमिताभ बच्चन यांच्यासमोर आल्यामुळे या प्रसंगाची प्रसिद्धी कमालीची वाढली. अमिताभ बच्चन यांच्याबद्दल ज्या भावना, जी आदरयुक्त भीती, जे दडपण मोठ्यांना येतं, तसं इशीत भट्टला वाटणं शक्यच नाही. अमिताभ बच्चनला प्रत्यक्ष समोर बघताना अतिउत्तेजित होऊन 'अजि म्या ब्रह्म पाहिले' या भाव-नेने भल्याभल्यांना सुचेनासे होते, हे आपण अनेकदा बघितले आहे. पण इशीतच्या पिढीने केवळ केबीसीमध्ये आणि जाहिरातीतच त्यांना बघितलं असण्याची शक्यता आहे आणि तेही घरी नियमित केबीसी बघितले जात असेल तरच. पालकांनी अमिताभच्या व्यक्तिमत्त्वाचा आवाका इशीतला सांगितला असेलही. पण ती माहिती गांभिर्याने घेण्याचं त्याचं वय नाही आणि तेवढी त्याला समजही नाही. इशीत उद्धटपणे, आगाऊपणे वागला असं भाष्य करणाऱ्यांनी लहान मुलांचे नृत्याचे आणि संगीताचे रिलिटी शो बघावेत. लहान मुले बघत असलेल्या कार्टून्समधल्या पात्रांचा अभ्यास करावा. जाहिरातीतली लहान मुलं बघावीत आणि रोजच्या हिंदी आणि मराठीमधल्या संस्कारी मालिका बघाव्यात.

जेमतेम अर्धा तास इशीत हॉट सीटवर होता आणि तेवढ्याच वेळात त्याच्या वागण्यावर गदारोळ उठला. ज्यावेळी याच वयाची मुलं रिॲलिटी शोमध्ये नृत्य करतात, गाणी गातात, त्यावेळी तर अनेकदा वयाला न साजे-शा गाण्यांची निवड केली जाते. त्यावर नृत्य करताना उत्तेजक हावभाव, विचित्र स्टेप्स बघणं असह्य होतं. या शोमधले परीक्षकही डोकं गहाण ठेवून केवळ कौतुक करण्यासाठी आणि छचोरपणा करण्यासाठी बसलेले अस-तात. परफॉर्मन्सच्या मध्ये सुरू अस-लेली हुल्लडबाजी आणि वाह्यातपणा बघता संतापाशिवाय दुसरी कोणतीच भावना मनात येत नाही. स्पर्धकांच्या जोड्या जमवल्या जातात, त्यांना एकमेकांवरून चिडवलं जातं. प्रपोज करणं, क्रश, ब्रेकअप, लव्ह ट्रँगल... ही भाषा सतत वापरली जाते आणि या प्रकाराचं प्रचंड कौतुक केलं जातं. म्हणजे प्रत्यक्षातही असंच वागायचं असतं अशी स्पर्धकांची समजूत हो-तेच, पण बघणाऱ्या असंख्य लहान मुलांचीही खात्री होते. परफॉर्मन्सवर टिप्स, चुका समजावणं, सुधारणा करणं या बाबी महत्त्वाच्या नस-तातच. प्रत्येक परीक्षक शब्दकोषात कौतुकभरल्या नवीन शब्दांची मोल-ाची भर टाकण्याचे काम नेमाने करत असतो. फक्त कौतुक आणि तोंडी लावायला रडणं. रडणं हे भावनिक बुद्ध्यांक दाखवणारं. त्याचं प्रदर्शन पण अत्यावश्यक. स्पर्धक, परीक्षक, प्रेक्षक यांनी टिपं गाळून आपल्या 'संवेदनशीलतेचं प्रदर्शन करणं' ही अट पाळली की पुढच्या राऊंडच्या प्रवेशा-चा मार्ग मोकळा. शास्त्र असतं ते. त्यामुळे टिपं गाळण्याचं हे संसर्गजन्य अस्त्र कायम सगळेचजण भात्यात ठेवून असतात.

अशा रिलिटी शोवर कुणीच काहीच कसं बोलत नाही? इशीत तर फक्त अर्धा तास पडद्यावर होता. बाकी शोमधील मुलं तर दर आठवड्याला पडद्यावर येतात आणि परीक्षक आणि स्पर्धकांचे निरर्थक संवाद, माकडचाळे बघावे लागतात. निषेध करायचा, टीका करायची किंवा गदारोळ करायचा, तर केबीसीतल्या इशीतवरच का? तसंच अनेकांच्या घरी टीव्हीवर मालिका बघितल्या जातात. वडीलधारी बघतातच, पण त्याचा कळत-नकळत परिणाम लहानांवरही होत अस-तो. शून्य अभिरूची आणि बुद्धीशी कौतुक, प्रसिद्धी, रील, फोटो या दैनंदिन जगण्यातल्या आवश्यक बाबी आहेत असा त्यांचा समज होत असेल तर नेमका दोष कुणाचा? मुलांनी काहीही केलं तरी टाळ्या पडल्याच पाहिजेत, हा पालकांचा अट्टाहास मुलांवरही परिणाम करतो. आपल्यावर टीका केलेली मुलांना अजिबात सहन होत नाही. कोणतीही कृती करण्याच्या आनंदापेक्षा त्याचं प्रदर्शन करणं मुलांना महत्त्वाचं वाटू लागतं. अगदी अतिरेक म्हणजे काही पालक मुलांच्या गुणपत्रिकासुद्धा समाजमाध्यमावर टाकतात. याशिवाय हल्लीच्या पालकत्वानुसार मुलं आणि आई-वडिलांचे मैत्रीपूर्ण संबंध असावेत असं शास्त्र आहे. पण प्रसंगी मैत्रीची मर्यादा ओलांडून ही मुले दादागिरी कधी करू लागतात हे समजतही नाही. त्यामुळे फटकून असलेल्या या मालिकांमध्ये नकारात्मक व्यक्तिरेखांचे उदात्तीकरण इतक्या जास्त प्रमाणात दाखवले जाते की अशी पात्रं प्रत्यक्षातही असणार, यावर लहान मुलांचा नक्कीच विश्वास बसू लागतो. फरशीवर तेल सांडवणं, पदार्थात मीठ/ तिखट ओतणं, गॅसचा नॉब उघडून ठेवणं, कपड्यांवर शाई सांडवणं... बालबुद्धीलाही लाजवतील अशा अभिनव कल्पनांचा सुकाळ असणाऱ्या या मालिका लहान पिढीवर काय परिणाम करत असतील याचा विचारही करवत नाही. हीच बाब मुलांच्या कार्टून शोबद्दल. त्यातली पात्रं तर कमालीची आगाऊ, वात्रट आणि वाचाळ असतात. लहान मुलं तर या कार्टून्सच्या आकंठ प्रेमात बुडालेली असतात. अशा वेळी त्यांचं अनुकरण मुलांनी केलं नाही तरच नवल.

हे सगळे टीव्हीच्या माध्यमातून होणारे संस्कार. पण घरातल्या पालकांकडून काय घडतं? लहान मुलांनी काढलेली चित्रं, गायलेली गाणी, कविता, केलेला नाच, फॅन्सी ड्रेस या सगळ्यांचं शूटींग करून रील्स काढली जातात, पोस्ट केली जातात. मग त्यानंतर पडणारा कौतुकाचा आणि लाईक्सचा पाऊस.. हे सगळे कुळाचार घरी यथास्थित पार पडत असल्याने लहान मुलांना ते नॉर्मल वाटू लागतं. आजच्या कुटुंबात सगळ्यात जास्त धाक कुणाचा असेल, तर तो लहान मुलाचा. त्याची आवडनिवड, त्याचे हट्ट त्याच्या मागण्या, त्याचे लाड ही पालकांची प्राथमिकता झाली आहे. ही मुलं आई-वडिलांशी, आजी-आजोबांशी, पाहुण्यांशी उद्धटपणे बोलतात. अशा वेळी इशीतवरच दोषारोपण का?

आज समाजात संस्कारवर्गाची खरी आणि महत्त्वाची भूमिका बजा-वली जाते आहे ती तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांद्वारे. या वेगवान त्सुनामीमध्ये सगळेच भरडून निघता-हेत. पण खरी फरपट होते आहे ती लहान मुलांची. त्यांना या माध्यमाचे आकर्षण वाटणं, त्यावर विश्वास बसणं, त्यांनी या आभासी दुनियेचं अनुकरण करणं हे साहजिकच आहे, कारण त्यांचा जन्मच मुळी हातात स्मार्टफोन घेऊन झाला आहे. पण त्सुनामीच्या या लाटेत पालकही वा-हवत जायला लागले तर कसं होईल? आज गोकुळाष्टमी म्हणजे दहीहंडीचा उत्सव, गणेशोत्सव म्हणजे मिरवणुका आणि ढोल, नवरात्र म्हणजे नऊ रंगाचे कपडे आणि गरबा, दिवाळी म्हणजे रोषणाई, फटाके आणि भेटवस्तू... असे लहान पिढीचे समज झाले आ-हेत. हे चुकीचे समज कुणामुळे? आ-पणच आपलं आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. खरं तर अशा वेळी एका दीपस्तंभाप्रमाणे आज पालकांनी आपल्या मुलांना योग्य मार्गदर्शन करणं गरजेचं आहे. मुलं कुठेही भरकटली तरी त्यांना त्यांचा दीपस्तंभ पालकांनी उपलब्ध करून दिला पाहिजे. दुर्दैवाने आजच्या वेगवान तंत्रयुगात पालकांच्या हाती मोजकेच पत्ते उरले आहेत. अनेक आगाऊ, अनावश्यक बाबींवर त्यांचा ताबा असूच शकत नाही. बाहेरच्या प्रत्येक प्रलोभनावर पालकांनी नियंत्रण ठेवणं अशक्य आहे. पण उरलेले हातातले पत्ते हे हुकुमाचे असणं ही आजच्या काळाची गरज आहे.

मग पालकांनी नेमकं करावं तरी काय? पालकांनी इतरांना दोष न देता, आपलं लहानपण आठवावं. आई-वडिलांची वागणूक आठवावी. आपल्या स्वतःच्या पालकांचाच आदर्श समोर ठेवून वागलं नाही, तर भविष्य कठीण असणार आहे. म्हणूनच २०२५ च्या बालकदिनाच्या निमित्ताने 'हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे। पालकांनी बालकांशी पालकासम वागणे।'

संक्षिप्त

भानुदास दोबाले यांना एम.फिल. पदवी प्रदान

आत्ताच एक्सप्रेस सुखापूरी प्रतिनिधी / डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या आंतरविद्या शाखेअंतर्गत जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाचे विद्यार्थी भानुदास लक्ष्मण दोबाले यांना त्यांच्या महत्त्वपूर्ण संशोधनासाठी मास्टर ऑफ फिलॉसॉफी (च.झहळश्र.) ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. दोबाले यांच्या शोधप्रबंधाचा विषय सामाजिक, साहित्यिक व संवादशास्त्रीय दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वपूर्ण आहे- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून मागास समाजाला मिळालेली वैचारिक भूमिका : एक संवादशास्त्रीय अभ्यास या विषयावर त्यांनी सखोल विश्लेषण करून आपले संशोधन पूर्ण केले. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनातून समाजातील वंचित घटकांना मिळालेली नवी ओळख, वैचारिक दिशा व सामाजिक समतेचे भान यावर त्यांनी विचारप्रवर्तक प्रकाश टाकला आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या कथा, कादंबऱ्या व लावण्यांमधील मागास समाजाचे चित्रण, त्यांच्या व्यथा-वेदना-संघर्ष व तळागाळातील नायक/नायिका उभे करण्याची त्यांची लेखणी, यांचे त्यांनी चिकित्सक अध्ययन केले आहे. साठे यांच्या साहित्याने वंचित समाजाला मिळालेले वैचारिक सामर्थ्य त्यांनी प्रभावीपणे उलगडले आहे. या संशोधनासाठी विभागप्रमुख डॉ. दिनकर माने यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. सोमीनाथ खाडे, डॉ. दिवाकर कुलकर्णी, डॉ. प्रसन्न पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. दोबाले यांनी ही पदवी - ग्रेड सह मिळवून आपल्या शैक्षणिक प्रवासात उल्लेखनीय यश मिळवले. याशिवाय, आर्ट ऑफ लिविंग परिवाराच्या वतीने डॉ. आत्माराम नाटकर, मा. सरपंच शिवाजी बामणे, योगेश हेंद्रे, संतोष काकडे, बबनराव पंचलोटे व माऊली दोबोले यांनी दोबाले यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सामाजिक भान जपणाऱ्या आणि विचारप्रवर्तक संशोधनामुळे भानुदास दोबाले यांचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या यशाने सामाजिक विषयांवरील संशोधनाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

दशसूत्रीच्या अंमलबजावणीसाठी २५ रोजी सर्व शाळांमध्ये पालक मेळावे

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/ दशसूत्री या विद्यार्थ्यांना संस्कारक्षम, आरोग्यक्षम, स्पर्धाक्षम करण्याच्या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मंगळवार दि.२५ रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये एकाच दिवशी पालकांचे मेळावे घेण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. दि.२५ रोजी सकाळी साडे नऊ ते अकरा या वेळत या मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे व पालकांना उपक्रमाची माहिती देण्यात यावी. उत्तम विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षकांप्रमाणे पालकांचा सहयोग असणेही आवश्यक आहे. त्यादृष्टिने पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी या मेळाव्यांचे आयोजन करावे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी म्हटले आहे.

औद्योगिक वसाहतीत कामात व्यत्यय, गौण खनिजाचे अवैध उत्खनन करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करा-जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/ येथील औद्योगिक वसाहतीत अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन, तसेच उद्योग उभारणीच्या कामात व्यत्यय काही व्यक्तिंकडून होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा व्यक्तिंविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

औद्योगिक वसाहतीत वितरीत भूखंडांतून अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन, तसेच उद्योग उभारणीच्या कामात काही व्यक्तिंकडून व्यत्यय होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. त्या संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात उद्योग संघटना, उद्योजक, परवानाधारक उत्खनक, खाण मालक , महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळ, ऑरिक सिटी, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी आदींची संयुक्त बैठक बोलावण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, ऑरिक सिटीचे अरुण दुबे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, कार्यकारी अभियंता गिरी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभितंता एस. के. चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी दिनेश झांपले, उप अभियंता राजेश चव्हाण, मसिआचे उपाध्यक्ष राहुल मोगले,मनिष अग्रवाल आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, जिल्ह्यात औद्योगिक वसाहतीत आलेल्या उद्योगांच्या उद्योग उभारणीच्या कामात काही व्यक्ति व्यत्यय निर्माण करीत आहेत. तसेच उद्योगाला वितरीत भूखंडातून अवैधरित्या गौण खनिज काढत आहेत.

उद्योगांना उभारणीसाठी लागणारे मुरुम, खडी, दगड आदी चढ्या दराने देत आहेत, अशा विविध प्रकारच्या तक्रारी प्रापत झाल्या आहेत.

अशाप्रकारे अवैध उत्खनन करणाऱ्या उत्खनकांना काळ्या यादीत टाकण्यात येऊन त्यांचा परवाना रद्द करण्यात येईल. तसेच उभारणीच्या कामात वत्यय आणणाऱ्या व्यक्तिंविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी आज यंत्रणांना दिले.

लासुर स्टेशन येथे माजी जिल्हा परिषद अध्यक्षा लता-ताई पगारे यांची फिरोज गादीघर येथे सदिच्छा भेट...

आत्ताच एक्सप्रेस

गंगापूर प्रतिनिधी/ गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई पगारे (शिवसेना नेत्या शिंदे गट) यांनी फिरोज गादी घर येथे सदिच्छा भेट देऊन हर्सूल/ सांवगी जिल्हा परिषद गटातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण याबाबत पत्रकारांशी चर्चा केली व हर्सूल सावंगी अर्थात लासुर स्टेशन जिल्हा परिषद गटात निवडणूक लढवण्याचा मानस व्यक्त करून जेष्ठ पत्रकार तथा साप्ताहिक लासुरवार्ताचे संपादक मधुकर दंडगव्हाळ, मराठीपत्र न्यूज चॅनलचे कार्यकारी संपादक गुलाब वाघ, दैनिक आत्ताच एक्सप्रेसचे गंगापूर तालुका प्रतिनिधी फिरोज मन्सुरी यांच्याशी निवडणुकीतील घडामोडी व संभाव्य राजकारण याविषयी माहिती घेतली .

प्रतिक्रिया :-

लासुर स्टेशन हे शिवसेनेचा बालेकिल्ला त्यामुळे जिल्हा परिषद गट आमचाच,संपूर्ण ताकदीनिशी जिल्हा परिषद निवडणूक लढवणार...

गंगापूर तालुक्यातील राजकीय सत्ताकेंद्र असलेल्या लासुर स्टेशन अर्थात हर्सूल/सावंगी जिल्हा परिषद गटावर शिवसेना शिंदे गटाने दावा केला असून हर्सूल/सावंगी शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने भाजप मित्रपक्ष असला तरी जिल्हा परिषद गटाच्या निवडणुकीत शिवसेना पालकमंत्री संजय सिरसाठ,खासदार संदीपान भुमरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका आम्ही संपूर्ण ताकदीनिशी लढवणार असल्याचा दावा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष लताताई पगारे यांनी आत्ताच एक्सप्रेसचे पत्रकारांशी बोलतांनां सांगितले असून विकासाच्या मुद्यावर पुन्हा एकदा जिल्हा परिषद बाळासाहेबांच्या शिवसैनिकांच्या ताकदीवर ताब्यात घरणार असल्याचाही दावा पगारे यांनी केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सर्व निवडणुका आम्ही लढवणार असून ऐतिहासिक विजय मिळवणार असल्याचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष लताताई पगारे यांनी सांगितले...

यावेळी बाजार समिती संचालक कैलास पाटील कुऱ्हाडे, पाडळशाचे अरुण पाटील सोनवणे, शिवसेनेचे दिनेश व्यवहारे व इतर शिवसैनिक यांची उपस्थिती होती.

नंद्राबाद जवळ ट्रक-दुचाकीची भीषण अपघात,दुचाकीस्वार जागीच ठार

आत्ताच एक्सप्रेस

खुलताबाद प्रतिनिधी / खुलताबाद-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील नंद्राबाद गांवा जवळील हॉटेल पंचवटी जवळ बुधवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास हॉटेल पंचवटी जवळ ट्रक आणि दुचाकीची जोरदार धडक होऊन दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला,या घटनेत मयत इसमाचे नांव गणेश वैजनाथ डाखोरे वय ३७ रा.वानवारला,ता. पुसद,जि.यवतमाळ असे आहे.या घटना संदर्भात अधिक माहिती अशी गणेश डाखोरे हे दुचाकी क्रमांक एम.एच. २९,बी.एस.१७ ९१ वरुन खुलताबाद कडुन छत्रपती संभाजीनगर कडे जात असतांना त्याचवेळी छजपती संभाजीनगरकडुन ट्रक क्रमांक एम.एच.१६ ए.एफ.१७३३ येत असतांना दोन वाहनांची भीषण अपघात झाली.

या अपघाताची माहिती मिळताच खुलताबाद पोलीस स्टेशनचे बीट जमादार सिद्धार्थ सदावर्ते व किशोर गवळी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.त्यांनी पंचनामा करून महामार्गावर झालेली वाहतूक कोंडी तात्काळ सुरळीत केली.

या अपघातातील मयतास खुलताबाद येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले,या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ.वंदना गायसमुद्रे यांनी शवविच्छेदन केले. विशेष म्हणजे या मार्गावर जगप्रसिद्ध वेरूळ लेणी यामुळे

जड वाहनांना बंदी असताना ही या मार्गावरून अवजड वाहने सर्रासपणे ये-जा करत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.

श्रीक्षेत्र वेरूळ ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याची जय्यत तयारी उत्साहात सुरू...

आत्ताच एक्सप्रेस

खुलताबाद प्रतिनिधी / खुलताबाद तालुक्यातील क्षेत्र वेरूळ येथील ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांच्या ३६ व्या पुण्यस्मरण निमित्त ओम जगद्गुरु जनशांती धर्मसोळ्याचे आयोजन श्रीक्षेत्र वेरूळ येथे उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या या कार्यकाळात पार पडणार आहे या भव्य सोहळ्याची जय्यत तयारी जय बाबाजी परिवार तर्फे मोठ्या उत्साहाने सुरू आहे श्री क्षेत्र वेरूळ येथे श्री संत जनार्दन स्वामी आश्रम परिसरामध्ये चालू आहे आज जय बाबाजी भक्त परिवार आयोजित पत्रकार परिषदेमध्ये उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राजेंद्र पवार यांनी सोहळ्याची माहिती दिली सालाबाद प्रमाणे परमपूज्य बाबाजींचे पुण्यस्मरण जय बाबाजी भक्त परिवार स्वामी शांतिगिरी जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी मोठ्या उत्साहामध्ये साजरा करत असतो या सोहळ्याला नऊ जिल्ह्यातील ६७ तालुक्याचा प्रामुख्याने सहभाग असून महाराष्ट्र सह संपूर्ण भारतामधून अनेक पूजनीय साधुसंत व मान्यवर सहभागी होणार आहे आठ दिवस लाखो भाविकांची मंदियाली या पवित्र परिसरामध्ये होणार असून गेल्या दोन महिन्यात पासून या सोहळ्याची तयारी चालू आहे ही तयारी आता अंतिम टप्प्यात असून आश्रम परिसरामध्ये या सोहळ्याचं वैशिष्ट्य असलेलं परमपूज्य बाबाजींनी दिलेली अनुष्ठान परंपरा यासाठी जवळपास ११००० भाविक यामध्ये पुरुष व माता-भगिनी यांचा सहभाग असून आठ दिवस मौनवृत्तामध्ये राहून परमपूज्य बाबाजींनी दिलेला अनुग्रह याचा ते जप करतील यांच्या व्यवस्थेसाठी १ लाख स्केअर फुटाचा वैजापूर येथील शर्मा मंडप यांचा

वॉटरप्रूफ भव्य मंडप लावण्यात आले आहे. दुसरी महत्त्वाची परंपरा परमपूज्य बाबाजींनी जी दिली आहे ती यज्ञ यासाठी राजस्थानी शैलीतील राजस्थानी कारागिरांनी

बनवलेला बांबू व गवत या पासून जवळ पास दोन एकर मध्ये भव्य मंडप उभारण्यात आला आहे या यज्ञ मंडपामध्ये ७७५१ कुंड याची निर्मिती केली असून आठ दिवस या यज्ञामध्ये जवळपास २५ हजार भाविक सपत्नीक सहभागी होऊन यज्ञाचा लाभ घेतील या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे बाबाजींनी दिलेली श्रमदान परंपरा यानुसार १ कोटी तास श्रमदानाची नोंद होणार आहे अनुष्ठानासाठी बसणाऱ्या ११००० भाविकांकडून १११ कोटी जप होणार आहे यज्ञासाठी बसणारे २५००० भाविकाकडून सव्वा कोटी यज्ञ आहुती म्हणजे हवन होणार आहे यासोबत या सोहळ्यामध्य अखंड नंदादीप, नामस किर्तन ,अभिषेक, एकनाथी भागवत पारायण व दररोज येणाऱ्या लाखो भाविकांसाठी अखंड अन्नदान त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व आरोग्याची व्यवस्था याचे नियोजन केले आहे यासाठी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जय बाबाजी भक्त परिवारातील विविध समित्या कार्यरत आहे महान संतांच्या पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये लाखो भाविकांच्या उपस्थितीत होणारे अनुष्ठान व यज्ञकर्म याचे फळ हे भारत मातेच्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे असे पत्रकार परिषदेमध्ये जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या वतीने सांगण्यात आले या पवित्र सोहळ्यामध्ये आर्किटेक महेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार स्वाती नरेंद्र सोळुंके निर्मित परमपूज्य बाबाजींची २१ फुटाची मूर्ती भगवान शिवांची १६ फुटाची मूर्ती भगवान पांडुरंगाची १५ फूट उंचीची मूर्ती यासोबत अखंड हिंदुस्तानचा आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचा पूर्ण कृती पुतळा व महाराणा प्रताप यांचा पूर्ण कृती पुतळा याचे दर्शन सुद्धा या सोहळ्यामध्ये होणार असून यासाठी सुशोभीकरणाचे काम साकला नर्सरीचे श्री सुरेश शेठ सागला हे करणार आहे अशा या वैशिष्ट्यपूर्ण सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील लाखो भाविकांनी तन मन धनाने सहभागी होऊन ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांचा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले या पत्रकार परिषदेला उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती यासोबत आश्रमिय संत शिवेश्वर गिरी महाराज महिंद्र गिरी महाराज व नित्यानंद महाराज हे उपस्थित होते यासोबत या सोहळ्याची उभारणी प्रमुख डी सी गायकवाड, संदीप मोडके नाशिक येथील सुभाष भाऊ पोरजे, मंगेश भाऊ डेरले, केशव गोसावी व श्रमदानासाठी उपस्थित जय बाबाजी फक्त परिवारातील भाविकांची मोठी उपस्थिती होती.

रोटरी प्रांत ३१३२ चमकला राष्ट्रीय पटलावर; ८ पुरस्कारांचा बहुमान

आत्ताच एक्सप्रेस

जालना प्रतिनिधी / दिल्ली येथे पार पडलेल्या रोटरीच्या राष्ट्रीय परिषदेत प्रांत ३१३२ ला तब्बल ८ पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, हा अभिमानाचा क्षण जालनासह संपूर्ण प्रांतासाठी ऐतिहासिक ठरला आहे. १८ वर्षांच्या इतिहासात प्रांताने प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय मानांकनाची कमाई केली असून, सन २०२४-२५ मध्ये प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उल्लेखनीय कामगिरीची देशपातळीवर दखल घेण्यात आली आहे.

रोटरीचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष फ्रान्सिसको अरेझो यांच्या हस्ते आणि आंतरराष्ट्रीय डायरेक्टर नागेश के. पी., मृगदा नंदन, माजी आंतरराष्ट्रीय डायरेक्टर अनिरुद्ध रॉय, व राजू सुब्रमण्यम यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रांत ३१३२ ला रोटरी फाउंडेशनमधील उत्कृष्ट योगदानासाठी ४ पुरस्कार, सदस्यवाढ व क्लब विस्तारासाठी ३ पुरस्कार तर जनमानसात रोटरीची प्रतिमा उंचावल्याबद्दल चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला. रोटरी ३१३२ च्या स्थापनेपासून आजवरच्या सर्वाधिक पुरस्कारांचा हा विक्रम ठरला असून, डॉ. साबू यांच्या नेतृत्वगुणांची राष्ट्रीय पातळीवर ठळक नोंद झाली.

परिषदेला प्रांतपाल सुधीर लातूरे, सन २०२६-२७ चे नियोजित प्रांतपाल जयेश पटेल, २०२७-२८ चे नियोजित प्रांतपाल प्रा. क्षितिज झावरे, माजी प्रांतपाल हरीश मोटवानी, प्रमोद पारीक, अनिल परमार, डॉ. दीपक पुरोहित, किशोर कुमार, ज्येष्ठ सदस्य सतीश लोणीकर, डॉ. दीपक पोफळे, नितीन कुदळे, उद्धव शिरसाट, ईश्वर बोरा, प्रसन्ना खाजगीवाले, रवी बनकर तसेच जालना येथील रोटरी क्लबच्या अध्यक्षा वर्षा पित्ती, निर्मला साबू, संगीता लातुरे, पारुल पटेल, मधुरा झावरे, केतकी कुलकर्णी, धनश्री केळकर आदींची उल्लेखनीय उपस्थिती होती.

डॉ. सुरेश साबू यांना नियोजित प्रांतपालांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उदबोधनाची मानाची संधीही मिळाली. प्रांताला मिळालेले आठ मानाचे पुरस्कार हा आपल्या कार्यकाळाचा सर्वोच्च सन्मान आहे. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, शांतता व स्वच्छता या क्षेत्रांत प्रांतातील सर्वांच्या सहयोगाने परिणामकारक कामगिरी उभी करता आली, याचे समाधान अधिक आहे, अशी कृतज्ञ प्रतिक्रिया डॉ. साबू यांनी व्यक्त केली.

या पुरस्कारांमुळे रोटरी ३१३२ च्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटला असून, जालन्यातील डॉ. सुरेश साबू यांच्या नेतृत्वाची दैदिप्यमान छाप ठळकपणे समोर आली आहे.

श्रीकृष्ण नगर (जामवाडी) येथील युवकांचा भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश

युवकांचा भाजपमध्ये प्रवेश हा विकासावरचा विश्वास आहे - जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

आत्ताच एक्सप्रेस
जालना प्रतिनिधी / श्रीकृष्ण नगर (जामवाडी) ता.जालना येथील युवकांनी आज (ता.१८) रोजी शिवसेनेतून भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वात ठेऊन व भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांनी भाजपात प्रवेश केला.

अविनाश मोहिते यांच्या पुढाकाराने व समन्वयातून प्रवेश करणाऱ्यांमध्ये चिमाजी आण्णा पवार, कैलास बाबुराव पवार, तेजेश राजेंद्र धनवटे, सचिन राजेंद्र गुंजाळ, दिपक भगवान गुंजाळ, ज्ञानेश्वर माने, गणेश अशोक मोहिते, सुरज राजू पवार, ओम कैलास कूसळकर, विठ्ठल संतोष पवार, बबलू अवचितराव गुंजाळ, रोहित दिलीप धनवटे, अशोक रामकिसन मोहिते या युवकांचा समावेश.

युवकांचा भाजपमध्ये प्रवेश हा विकासावरचा विश्वास आहे, या युवकांच्या सहभागामुळे पक्ष अधिक सक्षम होणार असून सर्वांगीण विकासाला गती मिळेल असे प्रतिपादन भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले व सर्वांचे पक्षामध्ये मनःपूर्वक स्वागत करून त्यांच्या राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी अविनाश मोहिते, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, विष्णुबापू डोंगरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

बालगृहातील मुलांना शिक्षणासह सर्व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

आत्ताच एक्सप्रेस
जालना प्रतिनिधी / बालगृहातील मुलांना सुरक्षित, सुसंस्कृत आणि सक्षम भविष्य देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी शिक्षणासह सर्व आवश्यक सोयीसुविधा त्यांना उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

आज दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना शहरातील पंचायत समिती जवळ असलेल्या शासकीय मुलांचे बालगृह तथा निरीक्षण गृहास भेट दिली. यावेळी बालगृह तथा निरीक्षण गृहाचे अधिक्षक धनाजी खुपकर यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बालगृहांची पाहणी करताना त्यांनी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पोषण, तांत्रिक सुविधा आणि मानसिक सक्षमीकरणाच्या उपक्रमांचा आढावा घेतला. प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण मिळावे,तसेच येथील मुलांना वाचन-साहित्य, संगणक शिक्षण, क्रीडा साहित्य आणि अभ्यासासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्याचे त्यांनी सांगितले.

यासोबतच मुलांच्या आरोग्य तपासण्या नियमितपणे व्हाव्यात, पोषण आहारात कोणतीही तडजोड होऊ नये, स्वच्छता आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत असावी याबाबतही जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या. बालगृहातील मुलांसाठी समुपदेशन, कौशल्य विकास आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित करून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर त्यांनी भर द्यावा, बालगृह तथा निरीक्षण गृहाचे सुरू असलेले बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे सदरील बांधकामाचा दर्जा चांगला असावा असे निर्देश त्यांनी दिले. सदरील बालगृहात १४ व निरीक्षण गृहात १ असे एकूण १५ विद्यार्थी आहेत.

यावेळी येथील मुलांनी जिल्हाधिकारी यांना गीत गाऊन दाखवले तसेच जिल्हाधिकारी यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

संक्षिप्त

१ डिसेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस
जालना प्रतिनिधी / जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठिक १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

१३ डिसेंबरला राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस
जालना प्रतिनिधी / राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार शनिवार दि. १३ डिसेंबर, २०२५ रोजी जालना जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपआपसातील वाद तडजोडीने मिटविण्यासाठी नागरिकांनी लोकअदालतीचा लाभ घ्यावा. मोटार वाहन अपघात कायद्याअंतर्गत नुकसान भरपाईचे प्रकरणे, प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, बँकेची वसुली प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकारी न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रकरणे आदिसाठी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन केले आहे. असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष वर्षा मोहिते व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

खाजगी दुरचित्रवाणी वाहिनी आणि एफ.एम.कम्युनिटी रेडिओ सनियंत्रण समितीची जिल्हास्तरीय बैठक संपन्न

आत्ताच एक्सप्रेस
जालना प्रतिनिधी / खाजगी दूरचित्रवाणी वाहिन्या आणि एफ. एम. रेडिओ केंद्रे तसेच कम्युनिटी रेडिओ केंद्रावरुन होणाऱ्या सामुग्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ नुसार जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीची बैठक बुधवार दि. १९ नोव्हेंबर, २०२५ रोजी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली.

सर्व खाजगी वाहिन्यांनी केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ चे पालन करणे बंधनकारक असून, सदर कायद्यानुसार सर्व नोंदणीकृत खाजगी वाहिन्यांनी फ्रि टू एअर वाहिन्या आणि दूरदर्शन वाहिन्याचे प्रक्षेपण करणे बंधनकारक आहे. जाहिरात संहितेचे कार्यक्रमाच्या प्रसारणात उल्लंघन करणे, विविध धर्म, जाती, भाषा, वर्ग, समूह आणि समाजाच्या भावना दुखविणारे किंवा समाजात द्वेषभावना पसरविणारे प्रसारण करणाऱ्यांविरुद्ध चौकशी करून कारवाई करण्याचे अधिकार या समितीला असणार आहेत. अशा प्रसारणाची तक्रार आल्यास संबंधित केबल चालकाकडून कार्यक्रमाची दृश्ये मागविण्याचे अधिकार समितीला आहेत. ज्या नोंदणीकृत खाजगी वाहिन्या किंवा एफ. एम. रेडिओ केंद्र किंवा कम्युनिटी रेडिओ केंद्रावरून आक्षेपार्ह प्रक्षेपण करत असतील, अशा वाहिन्यांची किंवा रेडिओची तक्रार प्राप्त झाल्यास या कायद्यानुसार संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच अनिवार्य वाहिन्यांच्या प्रक्षेपणात व्यत्यय येणे, सिग्नल न मिळणे अशा त्रुटी आढळल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्यास प्राधिकृत आधिकाऱ्यांनी संबंधित केबल ऑपरेटरला समज द्यावी. जिल्ह्यातील कार्यरत खासगी एफ. एम. रेडिओ आणि कम्युनिटी रेडिओ स्टेशन्सद्वारे हवाई प्रसारण संहितेचे पालन होते का नाही, यावर लक्ष व नियंत्रण ठेवण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी दिल्या.

तक्रारींची शहानिशा करुन केबल चालक किंवा खासगी एफ. एम. रेडिओ विरुद्ध तात्काळ योग्य ती कारवाई करावी. जर एखाद्या कार्यक्रमाचा सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम होत असेल किंवा कोणत्याही समाजात असंतोष निर्माण होत असेल तर तात्काळ जिल्हाधिकारी तसेच राज्य व केंद्र शासनाच्या त्वरित नजरेस आणून द्यावे. तसेच जिल्ह्याकरिता तक्रार निवारण केंद्राची स्थापना करावी. जिल्हाधिकारी कार्यालयातील करमणूक कर शाखेने स्थानिक वृत्त वाहिन्यांना केबल ऑपरेटर म्हणून नोंदणी देण्याऐवजी फक्त केबल ऑपरेटर किंवा केबल परिचालक म्हणूनच परवानगी द्यावी. टपाल विभागानेही याबाबतची नोंद घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच खाजगी दूरचित्रवाणी वाहिनी किंवा एफ. एम. रेडिओ केंद्र किंवा कम्युनिटी रेडिओ केंद्रावरुन आक्षेपार्ह संदेशाचे प्रसारण होत असल्यास संबधित वाहिन्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्ह्यातील शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांमध्ये केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ कायद्याबाबत विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करावी, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी यावेळी दिल्या.

सुरुवातीस जिल्हा माहिती अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव अरुण सुर्यवंशी यांनी या खाजगी दूरचित्रवाणी सनियंत्रण समितीची रचना व तीची कार्ये तसेच खाजगी दूरचित्रवाणी वाहिन्यांवर आक्षेपार्ह कार्यक्रम व जाहिरात याविषयी दर्शकांकडून येत असलेल्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी तसेच केबल वाहिन्या आणि केबल चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी देशभर कायदा लागू केला आहे. तसेच स्थानिक खाजगी दूरचित्रवाणी वाहिन्या आणि एफ. एम. रेडिओ केंद्रे तसेच कम्युनिटी रेडिओ केंद्राचे सनियंत्रण करण्याचे काम ही समिती करणार असल्याची माहिती यावेळी दिली. या बैठकीस समितीचे सदस्य पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी म्हणून पोलिस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, दानकुँवर महिला महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विद्या पटवारी, कै.श्रीरंगराव बहुउद्देशिय स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष ङ प्रभाकर गवारे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

नगर परिषद निवडणूक जाहिरात प्रमाणिकरणासाठी समिती

आत्ताच एक्सप्रेस
जालना प्रतिनिधी / नगर परिषद सह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांचे काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने व्यापक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेत माध्यमांचा गैरवापर थांबविणे, मतदारांची दिशाभूल होऊ न देणे आणि जाहिरातीतील आचारसंहितेचे पालन बंधनकारक करण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली असून, अपर पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार आणि मुख्याधिकारी हे या समितीचे सदस्य असुन, जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून समितीचे कामकाज पाहणार आहेत.

उमेदवार तसेच राजकीय पक्षांना कोणतीही निवडणूक संबंधित जाहिरात इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर प्रसारित करण्यापूर्वी पूर्वप्रमाणन घेणे अनिवार्य आहे. भारतीय संविधान व कायद्यांना विरोध करणारा मजकूर, धर्म, जात, भाषा, लिंग किंवा पेहरावावर आधारित द्वेष निर्माण करणारे संदेश, प्रार्थनास्थळांचे फोटो किंवा व्हिडिओ, हिंसेला किंवा अस्थैर्याला प्रोत्साहन देणारे मजकूर व्यक्ती, संस्था किंवा न्यायालयाची बदनामी करणारी सामग्री, देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचविणारे विधान, परकीय देशांबद्दल अवमानकारक विधाने, संरक्षण दलाचे फोटो किंवा व्हिडिओ, राजकीय नेत्यांवरील खोटे आरोप, व्यक्तींच्या खासगी आयुष्यात अनुचित हस्तक्षेप, अनैतिक, अश्लील किंवा नीतिनियमांच्या विरुद्ध सामग्री अशा स्वरूपाच्या जाहिरातींना अनुमती मिळणार नाही आणि त्यांना पूर्वप्रमाणनही प्रदान केले जाणार नाही.

जाहिरात खर्चाची पारदर्शकता

जर जाहिरात राजकीय पक्षाने केली असल्यास, त्याची नोंद पक्षाच्या निवडणूक खर्चात नोंदविली जाणार आहे. उमेदवाराने केली असल्यास, ती उमेदवाराच्या खात्यात नोंदविली जाणार आहे. सोशल मिडियावरील वैयक्तिक मते जाहिरात म्हणून समजली जाणार नाहीत; परंतु आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय प्रचार केल्यास ती जाहिरात ठरेल आणि त्यासाठी प्रमाणन आवश्यक राहणार आहे.

पूर्वप्रमाणन अर्ज

निवडणुकीसाठी अर्ज करताना १० किंवा त्यापेक्षा कमी स्थानिक संस्थांसाठी जाहिरात करायची असल्यास जिल्हास्तरीय समितीकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल. १० पेक्षा अधिक किंवा राज्यभरासाठी जाहिरात करायची असल्यास राज्यस्तरीय समितीकडे अर्ज करवा लागेल. जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी किमान ५ कामकाजाचे दिवस आधी (सुट्टीचे दिवस वगळून) संबंधीत समितीकडे अर्ज करावा लागेल. अर्जाचा नमुना व आवश्यक माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किंवा जिल्हा माहिती कार्यालय, तळ मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, जालाना येथून उपलब्ध करून घेता येईल. अर्जासोबत जाहिरातींची इलेक्ट्रॉनिक प्रत आणि साक्षांकित जाहिरात संहिता जोडणे बंधनकारक आहे. जाहिरातींची कोणतीही देयके धनादेश, धनाकर्ष व ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवादित साक्षांकित केलेली प्रत व नोटराईज्ड अनुवाद प्रत जोडणे आवश्यक आहे. अर्ज ३ कामकाजाच्या दिवसात निकाली काढला जाईल. तसेच समितीने सुचिविलेले फेरबदल किंवा प्रसंग वगळणे अनिवार्य राहिल. मंजूर जाहिरातींना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अर्जदारास प्रमाणपत्र दिले जाईल.

मुद्रित माध्यमातील जाहिरात

मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिध्द करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु, अशा माध्यमातून जाहिरातील प्रसिध्द करताना आचारसंहिता किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होता कामा नये. तसेच, इतर प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता, प्रत क्रमांक आणि प्रत संख्या नमूद असणे बंधनकारक आहे. उल्लंघन आढळल्यास प्रेस ॲक्टसह लागू प्रचलित कायद्यांनुसार कारवाई होईल. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत.

सुखापूरी परिसरात पुन्हा बिबट्याचे दर्शन ; नागरिकांमध्ये भीतीचे सावट; वनविभागाच्या उपाययोजनांची मागणी जोरदार

आत्ताच एक्सप्रेस
सुखापूरी प्रतिनिधी/ अंबड तालुक्यातील सुखापूरी मंडळ परिसरात बिबट्याचा वावर सतत आढळून येत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अधिकच निर्माण झाले आहे. आज शनिवार रात्री आठ ते नऊच्या सुमारास सुखापूरी-बेलगाव वडीकाळ्या कुक्कडगांव व परिसरात पुन्हा एकदा बिबट्याचे दर्शन झाल्याचे ग्रामस्थांमध्ये भिंती निर्माण झाली आहे. या संदर्भात आज वडीकाळ्या येथील शेतकरयांनी अंबड नायब तहसीलदार यांच्या मार्फत गणेश नाईक वनमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या कडे एका निवेदनाद्वारे केली आहे

मिळालेल्या माहितीनुसार मागील एक आठवड्यापासून बिबट्याचा धुमाकूळ सुरू असून यामुळे शेतकरी व ग्रामस्थ काळजीत आहेत. शुक्रवारी मध्यरात्री रुई येथील शेतकरी भागवत ढवळे यांच्या शेतातील गोठ्यात घुसून बिबट्याने गाईचा बळी घेतल्याची गंभीर घटना घडली होती. ही बाब शनिवारी सकाळी उघडकीस आली. त्यानंतर अवघ्या काही तासांतच आज रात्री सुखापूरी-बेलगाव परिसरात पुन्हा बिबट्या दिसल्याने नागरिकांमध्ये मोठे भीतीचे सावट पसरले आहे.

स्थानिकांनी वनविभागाला वारंवार सूचना दिल्या असूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झालेल्या दिसत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेऊन वनविभाग, वनाधिकारी व प्रशासनाने तातडीने गंभीर दखल घेऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

सध्या शेतीतील रब्बी हंगामातील कामे चालू असल्याने कापूस वेचणी ऊस लागवड उस तोडणी गहु हरभरा पेरणी सारखी कामं चालू आहेत ह्या कामा करीता कामगार लेबर हे बिबट्याच्या भिंती मुळे कामावर येत नाही या कारणांनी शेतकरी परेशान झाले आहेत. यातच आज परत साडेगांव ते अंबड ही नित्य नियमाने सकाळी सात वाजता ची एसटी साडेगांवकडून अंबड कडे येत असताना वडीकाळ्या येथील एका नदीच्या लढ्यामध्ये जात असताना निदर्शनास आला असून परिसरात परत भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे या वरती उपाययोजना म्हणून वनविभागाने तसेच फॉरेस्ट अधिकारी व प्रशासनाने

गावात गस्त वाढविणे, पिंजरे लावणे आणि तातडीने पथके नियुक्त करणे यासारख्या कृती त्वरित हाती घेऊन नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशा विविध मागण्याचे निवेदन आज नायब तहसीलदार अंबड यांच्या मार्फत गणेश नाईक वनमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या कडे पाठवण्यात यावे अशी मागणी केली आहे वरील निवेदन डॉ श्रीहरी कळे,धिरज रक्ताटे ओम मते भागवत गव्हाणे,भागवन गव्हाणे व इतर शेतकऱ्यांनी दिलं आहे,.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813